सं. फौ. ख. क्र.४०/२०१७ निशाणी ६३

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – दादाराव रघुनाथ लिखार

वय – ५७ वर्षे, व्यवसाय – सहा पोलीस उपनिरीक्षक, अकोट ग्रामीण

पत्ता – रा. अकोट, ता. अकोट, जि. अकोला

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर. लोखंडे यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. मी उरळ पो.स्टे. येथे सन २०१४ ते २०२० या कालावधीमध्ये हे.कॉ. व सहा पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होतो. दि. २८.१२.२०१६ रोजी उरळ पो.स्टे. कार्यरत मा. ठाणेदार यांच्या आदेशाने अप क्र. २५१/२०१६ भादंवि कलम ३५४ चा तपास वर्ग करण्यात आला. सदर तपासकामी माझ्याकडे FIR, जबानी रिपोर्ट व केस डायरी तसेच फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र इ. प्राप्त झाले. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता मला असे दिसून आले की, सदर गुन्ह्यातील फिर्यादी हिने आरोपी रामदास वानखडे याच्या विरुध्द विनयभंगाचा रिपोर्ट दि.२७.१२.२०१६ रोजीच्या घटनेविषयी दिला होता.

२. सदर तपासकामी मी गायगाव येथील फिर्यादीच्या राहत्या घरी गेलो व तिची विचारपुस करुन तिचा जबाब नोंद करुन घेतला. फिर्यादी हिने घटनास्थळ दाखविले. सदर घटनास्थळाचा पंचनामा दोन पंचांसमक्ष मी केला. आता मला सदर घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६४** देण्यात येत आहे.

३. तसेच गुन्ह्यातील इतर साक्षीदार चंद्रकला यांचे जबाब नोंद केले. सदर गुन्ह्यातील आरोपी रामदास वानखडे याचा शोध घेवून त्यास पंचांसमक्ष अटक केली. आता मला आरोपीचा अटक फॉर्म दाखविण्यात आला त्यावर माझी पंचांची व आरोपीची सही आहे. त्यास **नि.क्र.६५** देण्यात येत आहे. दि.२९.१२.२०१६ रोजी २ साक्षीदारांचे नामे शेषराव वानखडे व मुरलीधर वानखडे यांचे जबाब नोंद केले. आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्याच्या विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. आर. पटोकार यांचे मार्फत उलटतपासः</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, दि.२९.१२.२०१६ नंतर सदर गुन्ह्यामध्ये मी कोणताही तपास केला नाही व कोणात्याही साक्षीदाराचे जबाब नोंद केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचा फौ.प्र.सं. कलम १६४ अन्वये जबाब नोंद करण्याकरीता न्यायालयास पत्र दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या आजूबाजूच्या घराच्या स्थानिक लोकांची चौकशी मी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचांना पंचनामा करण्याकरीता मी लेखी नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या जागेच्या मालकीबाबत मी कोणतेही कागदपत्र प्राप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हिच्या घरा शेजारी राहणारे लोकांची मी चौकशी केली असता त्यांनी मला फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नसल्याचे सांगितले म्हणून मी त्यांचे जबाब नोंद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व त्या गावातील इसम हे माझ्या वरीष्ठांकडे तक्रार करतील या भितीनी मी आरोपीविरुध्द २ दिवसांमध्ये तपास केला.

५. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्याचा मी चुकीचा तपास केला तसेच घटनास्थळ पंचनामा हा पो.स्टे. मध्ये बसून तयार केला तसेच आरोपी विरुध्द खोटे चुकीचे दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– ०६.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.07 13:24:40 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | ०६/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०६/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०७/०१/२०२६ |